महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

## (गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152

**ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले :-** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 17 मे, 2020
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 19 मे, 2020
6. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/235, दिनांक 21 मे, 2020
7. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 31 मे, 2020
8. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/265, दिनांक 31 मे, 2020
9. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 25 जून, 2020
10. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/325, दिनांक 26 जून, 2020
11. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 29 जून, 2020

------------------------------0000------------------------------

क्र दंडप्र-01/कावि/2020/339 दिनांक01 जुलै, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद या कार्यालयाकडील आदेश दिनांक 31 मे, 2020 अन्वये जळगांव जिल्हयाकरीता लॉकडाऊन कालावधी 30 जून, 2020 पावेतो वाढविण्यात आलेला असून शासनाकडील आदेश दिनांक 31 मे, 2020 मध्ये नमूद बाबी जळगांव जिल्हयाकरीता लागू करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 29 जून, 2020 अन्वये लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 31 जुलै, 2020 पावेतो वाढविण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, मी, **अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन उपोद्घातात नमूद या कार्यालयाचे आदेश दिनांक 19 मे, 2020, दिनांक 31 मे, 2020 व दिनांक 26 जून, 2020 मधील नमूद बाबी कायम ठेवून उपोद्घातात नमूद शासनाकडील आदेश दिनांक 29 जून, 2020 मध्ये नमूद तरतुदींच्या अधिन राहून खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

A) शासन आदेश दिनांक 19 मे, 2020 अन्वये जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीतील क्षेत्र हे **रेड झोन (Red Zone)** व जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे कार्यक्षेत्र वगळता **जळगांव जिल्हयातील** इतर सर्व क्षेत्राचा समावेश हा **Non Red Zone** (Orange & Green Zone) मध्ये करण्यात आलेला असून या कार्यालयाचे आदेश दिनांक 21 मे, 2020, दिनांक 31 मे, 2020 व दिनांक 26 जून, 2020 मध्ये नमूद केलेल्या बाबी कायम ठेवण्यात येत आहेत.

Scanned with CamScanner

B) शासन आदेश दिनांक 29 जून, 2020 मध्ये नमूद केल्यानुसार परिशिष्ट-I (Annexure-I) मधील परिच्छेद क्रमांक 01 ते 09 मधील सर्व बाबी (अंत्यविधीसाठी उपस्थित व्यक्तींच्या संख्येची मर्यादा वगळून) संपूर्ण जळगांव जिल्हयासाठी लागू राहतील.

C) शासन आदेश दिनांक 29 जून, 2020 मध्ये नमूद केल्यानुसार **जळगांव शहर महानगरपालिका जळगांव** यांचे कार्यक्षेत्रात परिशिष्ट-II (**Annexure-II**) मधील **परिच्छेद क्रमांक A** मध्ये नमूद बाबी लागू राहतील. तसेच जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे कार्यक्षेत्र वगळता **जळगांव जिल्हयातील** उर्वरीत सर्व क्षेत्रात परिशिष्ट-II (**Annexure-II**) मधील **परिच्छेद क्रमांक B** मध्ये नमूद केलेल्या बाबी ( मुद्दा क्रमांक 09 वगळून) लागू राहतील.

D) उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 29 जून, 2020 मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हाधिकारी , आयुक्त महानगरपालिका हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक परिस्थिती व कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव यांना अनुसरुन काही क्षेत्राकरीता, परवानगी देण्यात आलेल्या बाबींकरीता निर्बंध लागू करु शकतात. त्याअनुषंगाने जळगांव जिल्हयातील कोव्हिड-19 बाधित रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता पुढील प्रमाणे निर्बंध लागू राहतील.

1) जळगांव जिल्हयातील जळगांव महानगरपालिका, जळगांव व सर्व नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रामध्ये सर्व सलून दुकाने, ब्युटी पार्लर, बार्बर शॉप Prior appointments (अर्थात त्या ठिकाणी प्रतिक्षेत ग्राहक नसावेत) घेतलेल्या ग्राहकांना सेवा पुरविण्यासाठीच सुरु राहतील. तथापि सर्व संबंधितांना या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेले आदेश दिनांक 26 जून, 2020 मधील अट क्रमांक 01 ते 05 लागू राहतील.

2) संपूर्ण जळगांव जिल्हयामध्ये अंत्यविधी साठी केवळ 20 व्यक्तींच उपस्थित राहतील.

सदरचा आदेश उपोद्घातात नमूद संदर्भ क्र. 11 महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 29 जून, 2020 सोबत वाचावेत.

**सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.**

सदरचा आदेश हा आज दिनांक ०१/07/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**सहपत्र : महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 29 जून, 2020**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व / कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
7. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
8. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
9. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
10. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner